आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ ऑक्टोबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- भगवान गौतम बुद्धांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार देशाच्या विकासाचा मार्ग अभूतपूर्व आणि सकारात्मक बदल घडवणारा असेल असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- महाविकास आघाडीचं जागावाटप आज पूर्ण होण्याची शक्यता
- रेल्वेचं आगाऊ आरक्षण आता १२० ऐवजी ६० दिवस आधीपर्यंतच करता येणार
- बिहारमध्ये विषारी दारू प्यायल्याने २४ जणांचा मृत्यू तर १५ जणांची प्रकृती गंभीर

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतीय संघाची हाराकिरी, पहिल्या डावात ४६ धावात भारताचा संपूर्ण संघ तंबूत

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार देशाच्या विकासाचा मार्ग अभूतपूर्व आणि सकारात्मक बदल घडवणारा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय अभिधम्म दिवसानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

भाषा, साहित्य, कला आणि आध्यात्मिकता हे सांस्कृतिक आधारस्तंभ देशाला वेगळी ओळख देतात, असंही ते म्हणाले. जगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढे जाताना, देशाची संस्कृती आणि मूल्यांचा अभिमान बाळगण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं.

पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळं भगवान बुद्धांच्या वारशा प्रती आदर व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं. मूळ भारतीय असणाऱ्या ६०० पुरातन कलाकृती आणि अवशेष भारतात परत आणल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वसंतराव चव्हाण यांचे ते सुपुत्र आहेत. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं इथं पोटनिवडणूक होत आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं जागावाटप आज किंवा उद्या जाहीर होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत २१६ जागांवर सहमती झाली आहे, उरलेल्या जागांवर आजच्या बैठकीत सहमती होईल, असं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. काँग्रेसच्या ८४ जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली आहे. रविवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीनंतर या ८४ किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार आहे, असंही ते म्हणाले. राज्याच्या ८ विभागात महाविकास आघाडीच्या किमान ३ सभा घेण्याची तयारी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातल्या ६०० पदाधिकाऱ्यांनी नुकताच सामूहिक राजीनामा दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये संधी न दिल्यामुळे

कार्यकर्ते नाराज झाले असून त्यामुळे पुणे शहर पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा दिल्याचं सांगण्यात येत आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. या कार्यक्रमात आज जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

यंदा जून महिन्यात एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेने घेतलेल्या यूजीसी नेट २०२४ परीक्षेचा निकाल उद्या १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केला जाईल. राष्ट्रीय चाचणी संस्थेने समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

रेल्वे आरक्षणाची १२० दिवसांची मर्यादा आता ६० दिवस होणार आहे. त्यामुळं प्रवास करण्यापूर्वी ६० दिवस आधी तिकिट आरक्षित करता येईल. येत्या १ नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी सुरू होणार असल्याचं रेल्वे बोर्डानं कळवलं आहे. सध्या तिकिट आरक्षित केलेल्या नागरिकांना या निर्णयाचा काहीही फटका बसणार नाही. पण नव्यानं आरक्षण करणाऱ्यांना १ नोव्हेंबरपासून केवळ ६० दिवस पर्यंतचीच तिकिट आरक्षित करता येतील. परदेशी प्रवाशांसाठी ही मर्यादा पूर्वीप्रमाणे ३६५ दिवस असेल.

**<><><><><>**

दिवाळीपूर्वी बाजारातली कांद्याची मागणी पूर्ण करण्यासाठी केंद्रसरकारने आज नाशिक ते दिल्ली दरम्यानच्या ‘कांदा एक्स्प्रेस’ रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवला. ही विशेष गाडी, १ हजार ६०० मेट्रिक टन कांदा घेऊन येत्या २० ऑक्टोबरला नवी दिल्ली इथं पोहोचणार असून, त्यानंतर हा कांदा राजधानी दिल्लीतल्या घाऊक बाजारपेठांमध्ये वितरित केला जाईल असं ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी आज जाहीर केलं. लखनौ, वाराणसी आणि ईशान्येकडच्या राज्यांमध्ये देखील लवकरच कांदा एक्स्प्रेस गाड्या रवाना होतील, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

नायबसिंह सैनी यांनी हरियाणाचे मुख्यमंत्री म्हणून सलग दुसऱ्यांदा शपथ घेतली. राज्यपाल बंडारू दत्तात्रय यांनी पंचकुलामध्ये त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. तसंच अनिल विज, कृष्ण पंवर, राव नरबीर सिंह यांच्यासह १३ मंत्र्यांनीही शपथ घेतली. सैनी यांच्या शपथविधीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

या शपथविधीनंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार असणाऱ्या राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज चंडीगडमध्ये होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिषदेचं अध्यक्षपद भूषवणार आहेत.

**<><><><><>**

आसाममधल्या अवैध स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याशी संबंधित, नागरिकत्व कायद्याच्या कलम ‘6 अ’ ची घटनात्मक वैधता, सर्वोच्च न्यायालयानं आज 4:1 अशा बहुमतानं कायम ठेवली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या

अध्यक्षतेखालच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. आसाम करार, हा बेकायदेशीर स्थलांतराच्या समस्येवरचा राजकीय उपाय होता, असं न्यायालयानं आज हा निर्णय देताना सांगितलं.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या घटनापीठासमोर 'कलम ६ अ' मधल्या तरतुदींना आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी सुरू होती.

१९८५ मध्ये आसाम करारानंतर कलम '६ अ' समाविष्ट करण्यात आलं होतं. २०१९ साली आसाममधल्या राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी साठी ते आधारभूत मानलं गेलं होतं. कलम '६ अ' ने आसामसाठी एक विशेष तरतूद तयार केली, ज्याद्वारे १ जानेवारी १९६६ पूर्वी बांगलादेशातून आलेल्या भारतीय वंशाच्या व्यक्तींना त्या तारखेपर्यंत भारताचे नागरिक मानलं गेलं.

**<><><><><>**

बिहारमध्ये सिवान आणि सारण या जिल्ह्यांमध्ये विषारी दारू पिऊन काल २४ जणांचा मृत्यू झाला, तर १५ जणांची प्रकृती गंभीर आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सिवानमध्ये २० जणांचा, तर सारण जिल्ह्यात ४ जणांचा मृत्यू झाला.

या प्रकरणाचा पोलीस तपास सुरु असून, विषारी दारूमुळे प्रभावित गावांमध्ये दारूबंदी आणि उत्पादनशुल्क विभागाचे अधिकारी पोहोचले आहेत. मृतांमध्ये मशरख आणि भगवानपूर हाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या गावांमधल्या नागरिकांचा समावेश आहे.

विषारी दारू पिऊन मृत्युमुखी पडलेल्यांपैकी अनेक जणांच्या नातेवाईकांनी पोलिसांना पूर्वकल्पना न देता त्यांच्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार केल्यामुळे मृतांचा

आकडा वाढण्याची शक्यता असल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज सिवान आणि सारण जिल्ह्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

कसोटी क्रमवारीत आंतरराष्ट्रीय पातळीवर पहिल्या स्थानावर असलेला भारतीय संघ, न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्याच्या पहिला डावात अवघ्या ४६ धावात तंबूत परतला. भारताची ही देशातली सर्वात कमी आणि एकूण तिसऱ्या क्रमांकाची किमान धावसंख्या आहे. बेंगळुरूमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरुच शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे एकूण ५ खेळाडू शून्यावर बाद झाले. रिषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ गडी बाद केले. विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ भारतीय खेळाडूंना तंबूत परत पाठवलं. या कसोटीला हा दुसरा दिवस आहे. पावसामुळं काल पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या १ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

जागतिक कसोटी क्रमवारी भारत सध्या सर्वोच्च स्थानावर असून न्यूझीलंड सहाव्या स्थानी आहे. यापूर्वी बांग्लादेशासोबत खेळलेली मालिका भारतानं २-० अशी जिंकली होती. तर न्यूझीलंडनं श्रीलंकेविरोधातली मालिका ०-२ अशी गमावली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नुकत्याच आफ्रिका दौऱ्याच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यात मलावी या देशात पोचल्या आहेत. भारताच्या राष्ट्रपतींनी मलावी ला भेट

देण्याची ही पहिलीच वेळ आहे. राष्ट्रपती आज एका वाणिज्यविषयक कार्यक्रमात आणि त्यानंतर भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात सहभागी होतील.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या जागतिक ISSF नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत आज भारताच्या अनंतजीत सिंग याने स्कीट फायनल शॉटगन स्पर्धेत कास्यपदक पटकावलं. तर मैराज खान याला सहाव्या स्थानावर समाधान मानावं लागलं. तत्पूर्वी आज महिलांच्या स्कीट फायनलमध्ये गनेमत सेखॉन सहाव्या स्थानापर्यंतच पोहोचू शकली.

**<><><><><>**

स्टोकहोम खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताचे टेनिसपटू विजय सुंदर प्रशांत आणि जीवन नेंदूचेलियन आज सायंकाळी चेक प्रजासत्ताकाच्या पेतर नुझा आणि पॅट्रिक रिकल यांच्याशी लढत देणार आहेत.

काल संध्याकाळी भारताच्या संघाने स्वीडनच्या संघाचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला होता.

**<><><><><>**

नेपाळमध्ये सुरू असलेल्या SAFF महिलांच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धांमध्ये भारताचा सलामीचा सामना आज पाकिस्तान बरोबर होत आहे. संध्याकाळी सव्वा पाच वाजता सामना सुरू होईल. स्पर्धांच्या अ गटात भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश असून ब गटात नेपाळ, भूतान, मालदिव आणि श्रीलंकेचा समावेश आहे.